# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 20/01/2022 (गुरूवार)

(दुपार)

---

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत इनव्हेटीव टेक्सटाईल कंपनी एमआयडीसी बोरी येथे दिनांक 15/01/2022 चे 20.00 वा. दरम्यान फिर्यादीचा मोठा भाउ नामे– सुजित तांडेकर हा त्याचा मावस भाउ राजु बर्वे याचे एमएच–31/एम– 6252 क्रमांकाच्या मोटरसायकल वर मागे बसुन कंपनीमध्ये कामावर जात असता यातील अज्ञात आरोपीने आपले ताब्यातील ॲक्टीवा गाडी भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचा भाउ बसलेल्या गाडीला धडक दिली. या अपघातात त्याचे डोक्याला मुका मार लागल्याने उपचाराकरीता प्रथम माया हॉस्पिटल बुटीबोरी व नंतर मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दि. 18.01.22 चे 09.50 वा मरण पावला. संबंधित कागदपत्र प्राप्त झाल्याने मेडीकल मर्ग सुचनेवरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– धनराज टिमाजी ढवळे, वय 60 वर्ष, रा. राम मंदिर रोड सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 338, 304 (अ), 134(अ), 134(ब) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास अषोक तरमले मो. क्र. 9923699185 हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. अरोली – दिनांक 18/01/2022 चे 12.30 वा. ते 17.00 वा. चे सुमारास पो.स्टे. अरोली हद्दीत फिर्यादीयांची 16 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक उमेश इंगळे मो.क्र. 9923463461 हे करीत आहे.

### जबरी संभोग

पो.स्टे. पारशिवनी :– दिनांक 19/01/2022 चे 02.30 वा. ते 03.00 वा. चे सुमारास फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी वय 13 वर्ष ही शाळेत जाते असे सांगुन गेली होती. त्यादरम्यान आरोपी नामे– दुर्गेश सियानंद इनवाती, वय 24 वर्ष, रा. जय विजय लेआउट नारी रोड नागपुर व विधीसंघर्षग्रस्त बालक वय 15 वर्ष यांनी संगनमताने स्वताच्या मोटरसायकलवर फिर्यादीची अल्पवयीन मुलीस फुस लावुन पळवुन नेवुन तिचेसोबत बळजबरीने सामुहीक जबरी संभोग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 363, 376 (ड)(ए) भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि स्वाती यावले पोक्सो सेल पो.स्टे.रामटेक .मो.क्रं. 9011655284 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर